दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.११ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## पीओकेमध्ये पाकिस्तानचे लष्करी हेलिकॉप्टर कोसळले; २१ जणांचा जागीच मृत्यू!

इस्लामाबाद दि.१० (प्रतिनिधी)- पाकव्याप्त काश्मीरमधून एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. पाकिस्तान लष्कराचे एक 'एमआय-१७' हेलिकॉप्टर कोसळून भीषण अपघात झाला आहे. या दुर्घटनेत हेलिकॉप्टरमधील सर्व २१ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, या अपघातात कोणीही जिवंत वाचलेले नाही. तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हे हेलिकॉप्टर पाकव्याप्त काश्मीरमधील 'नीलम व्हॅली' भागात अतिरिक्त जवानांना घेऊन जात होते. मुझफ्फराबादजवळ उड्डाण घेत असतानाच अचानक हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. वैमानिकाने परिस्थिती नियंत्रणात आणत आपत्कालीन लँडिंग करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात यश आले नाही आणि हेलिकॉप्टर कोसळले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि लष्कराच्या बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. लष्कराने हेलिकॉप्टरमधील सर्व २१ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, अद्याप मृत जवानांची नावे अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

## मुंबई, पुणे महापौर कार्यालय अन् आरएसएस मुख्यालय उडवून देण्याची धमकी

### खलिस्तान नॅशनल आर्मीच्या नावाने धमकीचे ईमेल

पुणे दि.१० (प्रतिनिधी)- मुंबई-पुण्याचे महापौर कार्यालय आणि नागपूरमधील संघ मुख्यालय आयईडी बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. दुसरीकडे अहमदाबाद आणि गांधीनगरमध्ये आज १० जून ते २० सप्टेंबर दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याच्या गंभीर धमकीचे ईमेल मिळालेत. खालिस्तान नॅशनल आर्मीच्या नावाने ही धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे संवेदनशील भागांत सुरक्षा कडक करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाठवण्यात आलेल्या या धमकीच्या ई-मेलमध्ये केवळ मुंबई-पुणे महापौर कार्यालयच नव्हे, तर नागपूरमधील काही संवेदनशील ठिकाणे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय देखील लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या धमकीमध्ये आयईडी बॉम्बस्फोटाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून, हा घातपात घडवून आणण्यासाठी काही विशिष्ट वेळा आणि तारखांचाही संशयास्पद संदर्भ या ई-मेलमध्ये देण्यात आला आहे.

या धमकीच्या ईमेलमध्ये अत्यंत पद्धतशीरपणे वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या वेळा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये पुण्याच्या महापौर कार्यालयात दुपारी १:११ वाजता, तर पुण्याचे विधान भवन आणि नागपूरमधील रेशीमबाग येथील आरएसएस मुख्यालय (डॉ. हेडगेवार भवन) येथे दुपारी ३:११ वाजता स्फोट घडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, १० जून ते २० सप्टेंबर या कालावधीत पुणे आणि नागपूरमधील आरएसएसच्या विविध शाखांना सकाळी ६:११ ते रात्री ९:११ च्या दरम्यान लक्ष्य केले जाईल, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

धमकीमागील हेतू स्पष्ट करताना ईमेलमध्ये राजकीय आणि ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देण्यात आला आहे. १९८४ मधील ऑपरेशन ब्लू स्टार आणि ऑपरेशन वूडरोझला आरएसएस आणि भाजपने पाठिंबा दिला होता, ज्यामध्ये २०,००० शीख तरुण मारले गेल्याचा दावा यात करण्यात आला आहे. याच घटनेचा बदला घेण्यासाठी आरएसएस आणि भाजप संपवण्याची करण्याची भाषा या ईमेलमध्ये वापरण्यात आली असून, हिंदूंनी आपल्या मुलांना वाचवावे, असा थेट इशारा वजा धमकीवजा संदेशही देण्यात आला आहे. या अत्यंत संवेदनशील ईमेलच्या शेवटी इंजि. गुरनाख सिंग, रुकन शाहवाला, डॉ. गुरनीवैंर सिंग आणि खान राजाडा अशा चार व्यक्तींच्या नावांचा उल्लेख करण्यात आला आहे.

## १ कोटी विद्यार्थ्यांचे नुकसान, ७ आत्महत्या; जबाबदारी स्वीकारा

### 'कॉक्रोच जनता पार्टी'चे उद्यापासून देशव्यापी आंदोलन; पुण्यातून सुरुवात

पुणे दि.१० (प्रतिनिधी)- ''देशातील शिक्षण व्यवस्थेचे अपयश आणि 'नीट' परीक्षांमधील पेपरफुटीमुळे ६ ते ७ निष्पाप विद्यार्थ्यांना आपल्या प्राणांना मुकावे लागले आहे. विविध परीक्षांच्या गोंधळामुळे तब्बल १ कोटीहून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असतानाही, सरकारमधील कोणीही याची जबाबदारी घेण्यास तयार नाही. या संपूर्ण अपयशाला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हेच जबाबदार असून त्यांनी तातडीने राजीनामा द्यावा. या मागणीसाठी देशव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असून याची सुरुवात पुण्यातून होणार आहे ,'' अशी आक्रमक मागणी 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी आज पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत केली.

पुण्यात उद्या दुपारी चार वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात शांततेच्या मार्गाने आंदोलन करणार आहोत, त्यानंतर अमृतसर, लखनऊ ,जयपुर, बंगळुरू या ठिकाणीही आंदोलन केली जाणार आहे. या दरम्यान धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नाही मिळाला तर २० जून रोजी दिल्ली येथे देशव्यापी आंदोलन केले जाईल आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्यशिवाय परत जाणार नाही असा निर्धारही अभिजीत दिपके यांनी यावेळी व्यक्त केला.

कॉकरोच जनता पार्टीची कुठल्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. मात्र, तरुणांच्या प्रश्नांवर कोणाला आम्हाला समर्थन द्यायचे असेल तर स्वागत आहे असे नमूद करत अभिजीत दिपके म्हणाले की, एका राजीनाम्याने व्यवस्था बदलणार नाही याची कल्पना आहे. पण आपली चूक मान्य करत नसतील आणि जबाबदारीच घेत नसतील तर राजीनामा हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. आपली मुले राजकारणावर बोलतात याची आता आई-वडिलांना भीती वाटत आहे. मी अमेरिकेला जाताना आई जेवढी रडली नव्हती तेवढी ती मी परत आल्यावर रडली. तिला भीती होती की माझ्यावर हल्ला होईल. ही भीती प्रत्येक आई-वडिलांना वाटत आहे, माझे एकच सांगणे आहे की, मुलांना बोलण्यापासून रोखू नका. जेव्हा हजारो, लाखो विद्यार्थी बोलायला लागतील तेव्हा यांचा आवाज दाबण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही असे दिपके म्हणाले.

## सर्वाधिक काळ पंतप्रधानपदावर राहण्याचा पंडित नेहरुंचा विक्रम नरेंद्र मोदींच्या नावावर

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- देशाच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक क्षण नोंदवला जाणार आहे. सलग तीन वेळा जनतेचा कौल मिळवत सत्तेत आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या पंतप्रधानपदावरील ४ हजार ३९८ दिवसांच्या कार्यकाळाचा विक्रम मागे टाकणार आहेत.पण या विक्रमावरुनही आता विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण सुरु झालंय. नेहरुंच्या कार्यकाळाची बरोबरी होईल मात्र नेहरुंची बरोबरी होणार नाही अशा शब्दात काँग्रेसनं भाजपला प्रत्युत्तर दिलंय..तर मोदींचे भविष्यातील रेकॉर्ड कुणीही मोडू शकणार नाही असा दावा भाजपनं केलाय.. पंतप्रधान मोदींच्या कारकीर्दीला १२ वर्ष पूर्ण झाल्यानिम्मित भाजपकडून मेगा प्लॅनिंग सुरु आहे. उद्यापासून प्रगती पथ यात्रा सुरु होणार असून यामध्ये सर्व खासदार, मंत्री, आमदार आणि नेते सहभागी होणार आहेत.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ मे १९५२ रोजी पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. ते सलग ४ हजार ३९७ दिवस म्हणजेच १२ वर्षे आणि १४ दिवस देशाचे पंतप्रधान राहिले होते. लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून उद्या मोदींचा सलग ४ हजार ३९८ दिवस म्हणजेच १२ वर्षे १५ दिवस पूर्ण होणार आहेत. तसेच ७ ऑक्टोबर २००१ ते २२ मे २०१४ पर्यंत गुजरातचे मुख्यमंत्री आणि २६ मे २०१४ पासून आतापर्यंत देशाचे पंतप्रधान असा त्यांचा प्रवास राहिला आहे. लोकनियुक्त सरकारांचे प्रमुख म्हणून नरेंद्र मोदींनी तब्बल ९ हजार पेक्षा जास्त दिवस पूर्ण केले आहेत.

## नेहरू कुटुंबाचा त्याग विसरता येणार नाही, त्यांच्याशी तुलना होऊ शकत नाही-शरद पवार

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- ''पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यापूर्वी देशाला संघटित करण्याचे आणि इंग्रजांच्या अत्याचारातून मुक्त करण्याचे ऐतिहासिक काम केले. नेहरू हे नेहरू होते; त्यांच्या कर्तृत्वाची आणि देशाच्या इतिहासातील त्यागाची बरोबरी इतर कोणाशीही होऊ शकत नाही. नेहरू आणि मोदी याची तुलना करणे अशक्य आहे'', असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन मुंबईतील यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये पार पडला. या कार्यक्रमात पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते.

काँग्रेसच्या लोकांनी शिखांवर हल्ला केला असं एक मंत्री पंजाबमधे जाऊन बोलले. त्यानी लक्षात घ्यावं इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी बलिदान दिलं आहे. नेहरू गेल्यानंतर इंदिरा गांधी यांनी देशासाठी काम केलं. पाकिस्तानला धडा शिकवला, त्यांचे चिरंजीव राजीव गांधी यांची देखील हत्या झाली. त्यामुळे नेहरू कुटुंबाचा त्याग कुणी विसरू शकत नाही. त्यामुळे त्यांची कुणासोबत तुलना होऊ शकत नाही, अशा शब्दात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी फटकारलं आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी अमृतसरमध्ये ऑपरेशन ब्ल्यू स्टारवरून केलेल्या वक्तव्याने वाद वाढला आहे.



शरद पवार म्हणाले, मंत्रिमंडळातील एका नेत्याने इंदिरा गांधी यांच्यावर टीका केली. जगात देशाची प्रतिमा वाढवण्यामधे इंदिरा गांधी यांचा हात आहे. त्यांनी देशाच्या प्रतिमेशी कधीही तडजोड केली नाही. त्या मास्कोला गेल्या होत्या. त्या मॉस्को विमानतळावर उतरल्या त्यावेळी त्यांच्या स्वागताला काही काही अधिकारी होते. ज्यावेळी त्या उतरल्या त्यावेळी त्यांच्या दर्जाचा व्यक्ती आला नाही. त्याठिकाणी भारतीय दूतावासला इंदिरा गांधी यांनी विचारल आपलं शेड्युअल काय आहे? त्यांनी देशाच्या प्रमुखांना भेटायला जायचं आहे सांगितल. त्यावेळी इंदिरा गांधी त्यांना म्हणाल्या मला तुमच्या घरी यायचं आहे. गुजराल नावाचे भारतीय दूतावास होते त्यांच्या घरी त्या गेल्या.

इंदिरा गांधी यांनी घरी गेल्यावर लहान मुलांना बोलवायला लावल आणि त्यांच्यासोबत खेळू लागल्या. रशियाचे अध्यक्ष भेटायला थांबले होते. परंतु इंदिरा गांधी यांनी जाण पसंद केल नाही. त्यांनी सांगितल मी इथे आले त्यावेळी (पान ४ वर)

## पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर हवाई हल्ला; ११ मुलांसह १३ जणांचा मृत्यू

काबुल/इस्लामाबाद दि.१० (वृत्तसंस्था)- पाकिस्तानने मंगळवारी रात्री अफगाणिस्तानवर हवाई हल्ला केला. तालिबाननुसार, या हल्ल्यांमध्ये १३ लोकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ११ मुले, एक महिला आणि एक वृद्ध व्यक्ती यांचा समावेश आहे. १४ महिला जखमी झाल्या आहेत.

तालिबानचे मुख्य प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी सांगितले की, पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या हवाई हद्दीचे उल्लंघन केले. त्यांनी आरोप केला की, पाकिस्तानी सैन्याने कुनार, खोस्त आणि पक्तिका प्रांतांमधील नागरिकांच्या घरांना लक्ष्य करून बॉम्बफेक केली.

मुजाहिद यांच्या मते, हल्ल्यात जखमी झालेल्या १४ महिलांवर उपचार सुरू आहेत. त्यांनी हल्ल्यानंतर जखमी झालेल्या लोकांचे फोटोही शेअर केले. तालिबान सरकारनुसार, गेल्या एका वर्षात पाकिस्तानच्या लष्करी कारवाईत शेकडो लोकांचा जीव गेला आहे.

## करारास विलंब, त्यांना किंमत मोजावी लागणार; डोनाल्ड ट्रम्प इराणवर हल्ल्याचे आदेश देण्याच्या तयारीत

वॉशिंग्टन दि.१० (प्रतिनिधी)- अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा संघर्ष तीव्र होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. इराणने अमेरिकेचे लष्करी विमान पाडल्यानंतर दोन्ही देश आक्रमक झाले असताना आता डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्पष्ट इशारा दिला आहे. ''करार करण्यासाठी विलंब केला जात असल्याने आता इराणला किंमत मोजावी लागेल'', असे सूचक वक्तव्य ट्रम्प यांनी केले आहे. तर, इराणवर पुन्हा नव्याने हल्ला करण्याचे आदेश देण्याच्या अतिशय जवळ असल्याचे त्यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या माहितीत म्हटले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर एक पोस्ट केली असून, त्यात इराणला स्पष्ट इशारा दिला आहे. ''इराणचे लष्कर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. विशेषत: त्यांचे नौदल आणि हवाई दल अस्तित्वातच नाही. त्यांचा पूर्णपणे पराभव झाला आहे. इराणच्या फक्त तोंडात दम असून, त्यांच्याकडून कारवाई होत नाही. त्यांच्या फायद्याचा असणारा करार करण्यासाठी इराण खूप विलंब करत आहे. आता त्यांना याची किंमत मोजावी लागेल'', असा स्पष्ट इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या इशाऱ्यामुळे अमेरिका -इराण संघर्ष पुन्हा एकदा चिघळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. फॉक्स न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, डोनाल्ड पुन्हा एकदा इराणविरोधात हल्ल्याचे आदेश देण्याच्या अगदी जवळ होते त्यांनी म्हटले आहे. अमेरिका इराणमधील उर्जा प्रकल्प, पूलांना या हल्ल्यामधून लक्ष्य करण्याची भीती व्यक्त केली जात आहे, असे फॉक्स न्यूजच्या वृत्तात म्हटले आहे. एका पत्रकाराशी बोलताना ट्रम्प यांनी याबाबत खुलासा केल्याचे फॉक्सने म्हटले आहे.

## पुरुषोत्तमपुरी यात्रेत गोदावरी नदीत बोट उलटली; २ महिलांचा मृत्यू

बीड दि.१० (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या अधिकमास यात्रेदरम्यान मोठी दुर्घटना घडली. गोदावरी नदीत भाविकांनी भरलेली बोट अचानक पलटल्याने एकच गोंधळ उडाला. अनेक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असले तरी, दोन महिला भाविकांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे.

देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमास यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. याच दरम्यान गोदावरी नदी पार करताना भाविकांनी भरलेली बोट अचानक पलटल्याची घटना घडली. घटनेनंतर नदीकाठावर एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे ५० भाविक बोटीत बसून नदी पार करत होते. मात्र बोटीच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी



बसवण्यात आल्याचा आरोप भाविकांकडून करण्यात येत आहे. नदीच्या मध्यभागी पोहोचताच बोटीचा तोल गेला आणि काही क्षणांतच बोट उलटली. त्यामुळे सर्व प्रवासी पाण्यात पडले. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या मदतीने अनेकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

या दुर्घटनेत १० ते १२ वर्षांचा एक मुलगा बेपत्ता झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे. या घटनेनंतर यात्रेतील सुरक्षाव्यवस्था, बोटींची क्षमता आणि प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यात्रेच्या काळात अशा घटना टाळण्यासाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी भाविकांकडून केली जात आहे.

## देशात अराजक माजण्याची शक्यता; उद्रेक होईल-संजय राऊत

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- ''देशात अराजक माजण्याची शक्यता असून, लोकं रस्त्यावर उतरतील, अचानक उद्रेक होईल आणि हे सरकार त्या आगीत होरपळून जाईल,'' अशा शब्दात संजय राऊतांनी भाजपावर टीका केली. नुकत्याच पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीत झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सरकारला नमविण्यासाठी महत्वाचा मुद्दा उपस्थित केल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. राऊतांनी प्रशांत कदम यांना दिलेल्या मुलाखतीत विविध विषयांवर सविस्तर भाष्य केले.

''डिलिमिटेशन बिल पुन्हा घेऊन येण्याचे केंद्र सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. आमच्या लोकांवर देखील हात टाकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आमच्यासह राष्ट्रवादीने देखील मजबूत तटबंदी केली. आमच्या लोकांपर्यंत मोठ्या ऑफर्स घेऊन आलेले त्यांचे लोक पोहोचू शकले नाहीत. पण, आमचे बहुसंख्य खासदार विचलित होण्याच्या स्थितीत नाहीत. अतंत्य नीच पातळीला जाऊन काम सुरु असून, असं काम व्यापारीच करु शकतो'', अशी टीका राऊतांनी केली. ''काँग्रेसने असं कधीच केलं नाही. ते खानदानी श्रीमंत होते. तर हे (भाजपा) चोरांचे झालेले श्रीमंत आहेत'', असा घणाघातही राऊतांनी केला.

अजित पवारांवर ७० हजार कोटींचा आरोप स्वत: मोदींनी केला. अशोक चव्हाण, प्रफुल पटेलांवर जाहीर भाषणांमधून मोदींनी आरोप केले. त्यानांच आता मांडीवर घेऊन बसता? म्हणजे एकतर आरोप खोटे होते किंवा तुम्ही निर्लज्ज आहात, अशी कठोर टीका राऊतांनी केली. विविध पक्षात फूट पडत असताना आणि इतर घडामोडी घडत असताना मोदींच्या विरोधात लढण्याची ताकद विरोधकांमध्ये राहणार का? किंवा त्याबाबत विरोधकांकडे काय रणनिती आहे? असा प्रश्न विचारला असता राऊतांनी, ''देशात अराजक माजण्याची शक्यता व्यक्त केली. लोकं रस्त्यावर उतरतील, अचानक उद्रेक होईल आणि हे सरकार त्या आगीत होरपळून जाईल, कोणीही अमरपट्टा घेऊन आलेले नाही, आम्ही आशावादी आहोत'', असेही राऊत म्हणाले.

## शक्तीपीठ महामार्गाविरोधात विटा तहसिल कार्यालयावर शेतकरी आक्रोश मोर्चा

### पहाटे दोन वाजता सर्वेक्षण का?; राजू शेट्टींचा प्रांताधिकाऱ्यांना सवाल

सांगली दि.१० (प्रतिनिधी)- शक्तीपीठ महामार्गाविरोधात विटा तहसिल कार्यालयावर आज शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. खासदार राजू शेट्टी ही या मोर्चामध्ये उपस्थित होते. विटा तहसील कार्यालयामध्ये जात मोर्चेकरांनी ठिय्या मांडला. पहाटे दोन वाजता सर्वेक्षण का करताय असा राजू शेट्टी यांनी प्रांताधिकाऱ्यांना सवाल केला. यानंतर प्रांताधिकारी विक्रम सिंह बादल, उपविभागीय अधिकारी विपुल पाटील, तहसीलदार योगेश टोणपे यांनी मोर्चेकरांचे निवेदन स्वीकारले.

विटाजवळील भाग्यनगर, नागेवाडीसह अनेक गावांमध्ये पोलीस बळाचा वापर करून सलग दोन दिवस शक्तिपीठ महामार्गाचे ड्रोन सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न झाला. हे ड्रोन सर्वेक्षण करण्यास त्या त्या गावातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केल्यामुळे हे सर्वेक्षण थांबवण्यात आले . यादरम्यान पोलीस आणि शेतकऱ्यांमध्ये अनेक ठिकाणी झटापट देखील झाली. या निषेधार्थ आज विटा जवळील भागातील शेतकऱ्यांनी एकत्रित येत विटा तहसिल कार्यालयावर शेतकरी आक्रोश मोर्चा काढत शक्तीपीठ महामार्गाला विरोध दर्शवला.

दरम्यान, आज सांगली जिल्ह्यात शक्तिपीठ महामार्गासाठी आज पुन्हा पहाटेपासून पोलिस बंदोबस्तामध्ये ड्रोन मोजणीचा प्रयत्न झाला आहे. मात्र शेतकऱ्याचा विरोध कायम असल्याचं दिसून येत आहे. काल ड्रोन मोजणीस शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतर आज पहाटे पासून विटा जवळील नागेवाडी भागात ड्रोन मोजणीचा प्रयत्न झाला. मात्र दुसऱ्या दिवशीही स्थानिक (पान ४ वर)

## सुनील तटकरे आमच्यासोबत दगाफटका करू शकतात

### अनिकेत तटकरे आणि भरत गोगावलेंच्या भेटीनंतर महेंद्र दळवींची टीका

रायगड दि.१० (प्रतिनिधी)- कोकण विधान परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर अनिकेत तटकरे यांनी शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री भरत गोगावले यांची मुंबई येथील सुरूची या सरकारी निवासस्थानी जाऊन भेट घेतली आहे. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. तसेच आता शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच सुनील तटकरे आमच्यासोबत भविष्यात दगाफटका करू शकतात अशी भीती देखील दळवी यांनी बोलून दाखवली आहे. महेंद्र दळवी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले की, अनिकेत तटकरे हे विधानपरिषदेवर निवडून गेले आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीने आपल्या वरिष्ठांना आणि मंत्र्यांना भेटणे हे त्यांचे कामच आहे. त्यामुळे मी अनिकेत तटकरे यांचे स्वागत करेन. तटकरे कुटुंबाशी माझा कोणताही वैयक्तिक किंवा कौटुंबिक वाद नाही. मात्र, खासदार सुनील तटकरे यांच्या राजकीय प्रवासातील उलटफेर आणि त्यांच्या राजकीय धोरणांना माझा आज, उद्या आणि भविष्यातही कायम तीव्र विरोध राहील. रायगडच्या राजकारणात अत्यंत संवेदनशील ठरलेल्या पालकमंत्री पदावरून बोलताना महेंद्र दळवी म्हणाले, सुनील तटकरे हे सध्या पालकमंत्री पदाच्या विषयावर घुमजाव करत आहेत. मुळात पालकमंत्रिपद आणि विधानपरिषद जागा हा एकमेकांशी बर्गेनिंग करण्याचा विषयच नाही. परंतु, तटकरेंनी या दोन्ही गोष्टींचा वापर करून बर्गेनिंग करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप दळवी यांनी तटकरे यांच्यावर केला आहे.

## काँग्रेसमध्ये तृणमूल विलीन करण्याचा प्रस्ताव, ममता बॅनर्जींना उपाध्यक्षपदाची ऑफर

नवी दिल्ली दि.१० (वृत्तसंस्था)- भाजपकडून टीएमसीवर होत असलेल्या राजकीय हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करावा, अन्यथा भाजप आपप्रमाणे त्यांना त्रास देईल, असा प्रस्ताव सोनिया गांधी यांनी ममता बॅनर्जी यांना प्रस्ताव दिला आहे. पक्षातील लोकही अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात आहेत, त्यामुळे सध्या त्यांच्यासाठी परिस्थिती कठीण झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांनी स्वतः त्यांना वैयक्तिकरित्या फोन केला होता. सुत्रांच्या माहितीनुसार ममता बॅनर्जी यांनी यावर निर्णय घेण्यासाठी काही दिवसांची मुदत मागितली आहे. सूत्रांच्या मते, त्यांना असा प्रस्ताव देण्यात आला आहे की, जर त्यांनी टीएमसीमध्ये विलीनीकरण केले, तर त्यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि अभिषेक बॅनर्जी यांना महासचिव बनवता येईल.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्ती सुष्मिता देव यांनी बुधवारी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यासोबतच्या त्यांच्या भेटीचा एक फोटो समोर आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुष्मिता भाजपमध्ये सामील होऊ शकतात. गेल्या तीन दिवसांत टीएमसीच्या २ राज्यसभा खासदारांनी राजीनामा दिला आहे. यापूर्वी, ८ जून रोजी सुखेंदू शेखर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पक्ष सोडला होता. सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालच्या ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी ऋतब्रता बॅनर्जी यांना आपला नेता म्हणून नियुक्त करून एक वेगळा गट स्थापन केला होता.

८ जून रोजी, टीएमसीच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. खासदार आणि टीएमसीच्या माजी नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सांगितले की, खासदारांच्या स्वाक्षरीचे एक पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना पाठवण्यात आले आहे. त्यात स्वतंत्र संसदीय गटाच्या स्वरूपात वेगळ्या आसनव्यवस्थेची मागणीही करण्यात आली आहे.

# स्मरण साने गुरुजींचे...

२४ डिसेंबर १८९९ हा साने गुरुजींचा जन्मदिवस, तर ११ जून १९५० रोजी ते देवाघरी गेले. एकूण पन्नास वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले. एवढ्या अल्प कालावधीमध्येही त्यांनी मोठे काम करून दाखवले. आजही एखाद्या शाळेला, बागेला, ग्रंथालयाला, रस्त्याला साने गुरुजींचे नाव दिलेले आपण वाचतो.

साने गुरुजींचे हजेरीपटावरचे नाव पांडुरंग सदाशिव साने. या पांडुरंगाने पंढरपूरचे पांडुरंगाचे मंदिर सर्व जाती-धर्मांसाठी खुले केले ही, त्यांच्या आयुष्यातील मोठी कमाई! गुरुजींची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक होती. तरीही त्यांनी एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. हे शिक्षण घेताना कधी त्यांना माधुकरी मागावी लागली, कधी वार लावून जेवावे लागले, तर कधी डाळ मुरमुरे खाऊन अर्धपोटी-उपाशी झोपावे लागले. पण त्यांनी शिक्षणाचा ध्यास कधी सोडला नाही. गुरुजी अमळनेरच्या शाळेत शिक्षक झाले. त्यांनी मुलांना ज्ञान तर दिलेच; पण प्रेम, भक्ती, सेवा, कृतज्ञता यांचेही संस्कार दिले. खर्या अर्थाने गुरुजी हे नामाभिधान त्यांनी सार्थ केले.

१९२४ ते १९३० अशी सहा वर्षे गुरुजींनी वर्गात प्रत्यक्ष अध्यापन केले. शाळेत मुलांचे 'विद्यार्थी' नावाचे मासिक चालवले. गुरुजी शिक्षक, लेखक, कवी, पत्रकार, समाजसेवक, कथानिवेदक अशा अनेक भूमिका पार पाडत होते. त्यांचा 'पत्री' नावाचा काव्यसंग्रह फार गाजला. त्यातली 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे।' ही कविता फारच गाजली. आजही शाळाशाळांमधून ही कविता गायली जाते. तिला प्रार्थनेचे रूप आले आहे. ज्ञानेश्वरांच्या पसायदानातिकीच लोकमान्यता तिला मिळाली आहे.

पुढे भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन तीव्र बनत गेले आणि गुरुजींनी त्यात उडी घेतली. त्यांच्या दृष्टीने गांधीजी हे स्वातंत्र्यसूर्य होते. मग गुरुजींनी खादीचा प्रचार आणि प्रसार केला. गांधीजींची विचारधारा लोकांना सांगितली. काँग्रेससाठी अर्थसहाय्य मागितले. त्यासाठी भाषणे केली. तुरुंगवास पत्करला. या धामधुमीत लग्न करायचे राहूनच गेले. त्यांनी देशाचाच संसार केला. गुरुजींनी 'काँग्रेस' नावाचे साप्ताहिक चालवले. नंतर 'साधना' नावाचे साप्ताहिकही सुरू केले. अजूनही ते पुण्यातून ते प्रसिद्ध होते. गेली ६९ वर्षे ते समाजवादी विचारांची पेरणी करते आहे. समाजमने घडवीत आहे.

१९३२ साली गुरुजी धुळ्याच्या तुरुंगात होते. तेथे आचार्य विनोबाही होते. राजकैदी म्हणून त्यांना तेथे ठेवले होते. तेथे त्यांना कष्टाची कामे करावी लागत. विनोबा तेथील कैद्यांना दर रविवारी गीतेवर प्रवचन देत. त्यांनी अठरा अध्यायांवर अठरा प्रवचने दिली. वैफ्यांनी ती मनोभावे ऐकली. या ऐकणारांमध्ये साने गुरुजीही होते. त्यांनी विनोबांचा शब्दन्शब्द टिपून घेतला. पुढे त्याला ग्रंथरूप प्राप्त झाले. 'गीता प्रवचने' या नावाने तो ग्रंथ सर्वत्र पोहोचला. विनोबांसारखा रसाळ वाणीचा निरुपणकार आणि गुरुजींसारखा सिद्धहस्त लेखक यांच्या संयोगातून तो अक्षरग्रंथ सिद्ध झाला. धुळ्याच्या तुरुंगात त्याची निर्मिती झाली. तुरुंग काही वाईट नसतात. तेथे बयाच वेळा अक्षरवाययाची निर्मिती झालेली दिसते. लोकमान्य टिळकांचा 'गीतारहस्य' ग्रंथ मंडालेच्या तुरुंगात सिद्ध झाला. सावरकरांचे 'कमला' नावाचे महाकाव्य अंदमानच्या कोठडीत प्रसवले. पंडित नेहरूंनी 'भारताचा शोध' नावाचा ग्रंथ नगरच्या तुरुंगात लिहिला

'आंतरभारती' हे गुरुजींचे स्वप्न होते. प्रांताप्रांतामध्ये भांडण असू नये. उलट एकमेकांच्या भाषा, संस्कृती, परंपरा एकमेकांनी समजून घ्याव्यात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढीला लागण्यास मदत होईल अशी गुरुजींची विचारधारा होती. एका साहित्य संमेलनात त्यांनी आपले विचार मांडलेही होते. त्यासाठी पैशाची जमवाजमव सुरू केली होती. पण भारतीयांच्या नशिबात तो योग नव्हता.

गुरुजींनी कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्रे, निबंध, पत्रलेखन असे वाययाचे विविध प्रकार लीलया हाताळले. मुलांसाठी त्यांनी गोड गोष्टी लिहिल्या. कुमारांसाठी सुंदर पत्रे लिहिली. भारतीय संस्कृतीचे अंतरंग उलगडून दाखवले. 'श्यामची आई' सारखे मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र गायले. 'पत्री' काव्यसंग्रहातून देशभक्तीपर गीते लिहिली. 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो' हे अजरामर गीत गुरुजींचेच. गुरुजी असे आज शब्दांतून उरले आहेत. त्यांची वाणी, लेखणी आणि कृती देशासाठीच होती. त्यांनी हयातभर भव्यदिव्य, समर्थ, संपन्न आणि सामर्थ्यशाली भारताचेच स्वप्न पाहिले. मात्र, गांधीजींच्या हत्येमुळे त्यांना अतीव दुःख झाले. त्यासाठी त्यांनी एकवीस दिवसांचे उपोषण केले. स्वतः प्रायश्चित्त घेतले. तरीही मनावरचे मळभ दूर झाले नाही. ते अतिसंवेदनशिल असल्यामुळे त्यांना नैराश्य आले. त्यातच त्यांनी आपली जीवनज्योत मालवून टाकली. ज्ञानेश्वरांनी जसे आपले कार्य झाल्यावर समाधीरूपाने स्वतःला मालवून टाकले तसे. तरीही गुरुजी भारतीयांच्या मनात अमर आहेत. लेखणी आणि कृतीच्या रूपाने तर ते अमर आहेतच आहेत.

# थोर समाजसेवक : साने गुरुजी

पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी थोर समाजसुधारक होते. आईने केलेल्या सुसंस्कारातून त्यांनी विश्वातील संपूर्ण मानव जातीसाठी अनमोल सेवा केली, म्हणून त्यांना महाराष्ट्राची माऊली ही संबोधतात. त्यांनी आपल्या साहित्य रचनातून अनमोल अशा नैतिकता,मानवी मूल्ये व सुसंस्कारांची पेरणी केलेली आहे. त्यांच्या आईचे नाव यशोदा होते.या यशोदा माईने आपल्या मुलावर अगदी बालपणापासून सुसंस्काराची पेरणी करून ,साने गुरुजींच्या मनाची जडण-घडण निकोप पणाची केली.साने गुरुजींनी'श्यामची आई' या संस्कारुपी पुस्तकात आपल्या आईच्या साऱ्या स्मृती वर्णन केलेल्या आहेत.या विश्वातील सर्व मानव जातीवर प्राणी मात्रावर दया, माया दाखवून प्रेम करण्याचा धडा साने गुरुजींना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींनी आईने शिकविलेले संस्कार,नैतिक,व मानवी मूल्यांचे पाठ तंतोतंतपणे अंमलात आणले. साने गुरुजी हे हाडाचे शिक्षक होते.ते अत्यंत प्रामाणिकपणे आपल्या जवळील ज्ञान,माहिती विद्यार्थ्यांना देत असत, जगातील अनेक थोर व महात्म्यांची स्फूर्ती पदे व चरित्रे गुरुजी आपल्या वाणीतून विशद करीत असत. त्यांनी 'विद्यार्थी'नावाचे मासिक छापून ते खान्देशातिल गावा-गावात पोहचविले.

देशात त्या काळी इंग्रजांची राजवट होती. ही राजवट अत्यंत जुलमी होती.अशा समयी साने गुरुजी यांनी या जुलमी राजवटी विरुद्ध आवाज उठविला होता.प्रताप मिलच्या मजुरांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी गिरणी मालकाविरुद्ध निकराचा लढा देऊन मजुरांना न्याय मिळवुन दिला होता.१९४२ च्या भारत छोडो या लढ्यासाठी साने गुरुजींनी देशातील तरुण वर्गाला योग्य मार्गदर्शन केले. त्याना १९४३साली ब्रिटिशांनी अटक केली होती. त्यांची१९४५साली सुटका झाली,तेंव्हा त्यांनी युवा वर्गला राष्ट्रप्रेम राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा या विषयी मार्गदर्शन केले.तत्कालीन समाजात अस्पृश्यता व अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात होती.साने गुरुजींनी हरीजनाना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करून त्यांना मंदिरात प्रवेश मिळवून दिला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातही प्रवेश मिळवून दिला. साने गुरुजींनी मोठ्या प्रमाणात लिखाण केले. लेख,काव्य, निबंध कथा,कादंबऱ्या, नाट्य संवाद यातून तत्कालीन वास्तव चित्र रेखाटले.१५ऑगस्ट,१९४८ साली त्यांनी 'साधना'नावाचे साप्ताहिक सुरू करून ,त्यातून आपल्या समाजवादी विचारांचें लेखन केले.त्यांच्या सर्व साहित्यात श्यामची आई हे पुस्तक सर्व श्रेष्ठ आहे.

साने गुरुजींनी आपल्या आईलाच गुरू मानले होते. आई मुलाच्या जीवनाला आकार देते,मुलाचे संरक्षण, संगोपन, संवर्धन आईच करते, मुलं प्रत्येक चांगली व विधायक गोष्ट मूल आईकडूनच शिकतात असे ते मानत. त्यांनी 'श्यामची आई',या पुस्तकातून संपूर्ण विश्वाला आईची महत्ती पटवून दिली. अशा या थोर समाजसेवक,राष्ट्रसेवक, शिक्षणसेवकावर११जून,-

१९५०रोजी काळाने झडप घातली व आदर्श समाजसेवक आमच्यातून हिरावून घेतला. त्यांच्या स्मृतींना कोटी!कोटी!!प्रणाम.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# खेळ : आनंद आणि विकासाचा उत्सव

दि. ११ जून हा दिवस संपूर्ण जगभरात 'आंतरराष्ट्रीय खेळ दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने २०२४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत खेळाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला. खेळ ही केवळ करमणूक नसून ती बालकांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासाची एक अत्यावश्यक प्रक्रिया आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात खेळाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. बालकांच्या जीवनातील आनंद, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी खेळाची आवश्यकता आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून मानवी विकासाच्या मूलभूत हक्कांचा आणि मूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे.

खेळ हा प्रत्येक बालकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क करारातील कलम ३१ नुसार प्रत्येक बालकाला विश्रांती, खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार आहे. तथापि, जगातील अनेक बालके गरिबी, युद्धस्थिती, बालमजुरी, शिक्षणातील असमानता, सुरक्षित खेळाच्या जागांचा अभाव आणि सामाजिक विषमता यांमुळे या हक्कापासून वंचित राहत आहेत. वाढते शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक यामुळेही बालकांच्या खेळण्याच्या संधी कमी होत आहेत. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय खेळ दिन समाजाला खेळाच्या हक्काची आठवण करून देतो आणि बालकांना सुरक्षित, मुक्त आणि सर्वसमावेशक वातावरण उपलब्ध करून देण्याचे आवाहन करतो.




बालकांच्या शारीरिक विकासात खेळाचे योगदान अनन्यसाधारण आहे. धावणे, उड्या मारणे, सायकल चालविणे, पोहणे, चेंडूचे विविध खेळ आणि इतर शारीरिक हालचालींमुळे स्नायू बळकट होतात, शरीरातील समन्वय वाढतो आणि आरोग्य उत्तम राहते. नियमित खेळामुळे लठ्ठपणा, मधुमेह, हृदयरोग यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित समस्यांचा धोका कमी होतो. लहानपणापासून सक्रिय जीवनशैलीची सवय लागल्यास निरोगी भवितव्याची पायाभरणी होते. सध्याच्या काळात मोबाइल, दूरदर्शन आणि संगणकासमोर वाढता वेळ घालवल्यामुळे मुलांच्या शारीरिक हालचालींमध्ये घट होत आहे. परिणामी आरोग्याशी संबंधित विविध समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

खेळ मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच महत्त्वाचा आहे. खेळताना मुलांमध्ये आनंद, उत्साह आणि समाधानाची भावना निर्माण होते. विविध परिस्थितींना सामोरे जाताना समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि विचारशक्ती विकसित होते. जिंकण्याचा आनंद आणि पराभवाचा स्वीकार या दोन्ही अनुभवांमधून मुलांमध्ये मानसिक स्थैर्य निर्माण होते. आज अनेक मुले अभ्यासाचा ताण, स्पर्धेचे दडपण आणि सामाजिक अपेक्षांमुळे मानसिक तणावाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत खेळ हा तणावमुक्तीचा प्रभावी मार्ग ठरतो. खेळामुळे आत्मविश्वास वाढतो आणि जीवनातील आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाण्याची तयारी होते.

भावनिक विकासाच्या प्रक्रियेतही खेळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी खेळ नैसर्गिक माध्यम उपलब्ध करून देतो. खेळातील विविध अनुभवांमुळे संयम, सहनशीलता आणि आत्मनियंत्रण विकसित होते. संघातील इतर सदस्यांशी जुळवून घेताना परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. इतरांच्या भावनांचा आदर करणे आणि सामूहिक यशासाठी प्रयत्न करणे यांसारखे गुण खेळातून सहज आत्मसात होतात. त्यामुळे भावनिक परिपक्वतेच्या दृष्टीने खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

सामाजिक विकासात खेळाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. खेळ विविध पार्श्वभूमीच्या व्यक्तींना एकत्र आणतो. मैदानावर जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक स्थिती यांपेक्षा खेळाडू म्हणून प्रत्येकाची ओळख महत्त्वाची ठरते. संघभावना, नेतृत्व, शिस्त, परस्पर आदर आणि सामूहिक जबाबदारीची भावना खेळातून विकसित होते. समाजातील विविध घटकांमध्ये एकात्मता निर्माण करण्याची ताकद खेळामध्ये आहे. त्यामुळे सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत होण्यास मदत होते.

भारतीय संस्कृतीमध्ये खेळांना प्राचीन परंपरा लाभली आहे. कबड्डी, खो-खो, विटीदांडू, कुस्ती, मल्लखांब यांसारख्या पारंपरिक खेळांनी अनेक पिढ्यांचे बालपण समृद्ध केले आहे. हे खेळ शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच चपळता, धैर्य आणि सामूहिक सहभागाची भावना विकसित करतात. मात्र, आधुनिक जीवनशैली आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे या खेळांचे प्रमाण घटत चालले आहे. खेळण्यासाठी मोकळ्या जागांचा अभाव, अभ्यासाचा वाढता ताण आणि डिजिटल साधनांचे आकर्षण यांमुळे मुलांचे मैदानी खेळांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पारंपरिक खेळांचे जतन आणि संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल खेळांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. काही शैक्षणिक आणि बौद्धिक खेळ मुलांच्या ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त ठरू शकतात; मात्र डिजिटल खेळांचा अतिरेक शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतो. स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवल्यामुळे डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या, एकाग्रतेचा अभाव आणि सामाजिक संवादात घट यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे तंत्रज्ञानाचा संतुलित वापर करून मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

शाळा आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा परीक्षाकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे खेळाला दुय्यम स्थान दिले जाते. परिणामी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या संधी मर्यादित होतात. खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग मानून शाळांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रशिक्षित क्रीडाशिक्षकांची नियुक्ती, विविध खेळांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार उपक्रमांची आखणी यांमुळे खेळ संस्कृतीला चालना मिळू शकते. शिक्षण आणि खेळ यांचा समतोल राखल्यास विद्यार्थी अधिक सक्षम, आत्मविश्वासू आणि जबाबदार नागरिक बनू शकतात.

पालकांची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे. अनेक पालक मुलांच्या शैक्षणिक यशाला प्राधान्य देऊन खेळाला वेळेचा अपव्यय समजतात. मात्र, खेळ हा मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यावश्यक आहे. पालकांनी मुलांना खेळण्यासाठी वेळ उपलब्ध करून देणे, त्यांच्या आवडी-निवडी समजून घेणे आणि विजय-पराजयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मुलांसोबत खेळात सहभागी झाल्यास कौटुंबिक नातेसंबंध अधिक दृढ होऊ शकतात.

लिंगभाव समानतेच्या दृष्टीने खेळाचे महत्त्व विशेष आहे. अनेक ठिकाणी मुलींच्या खेळातील सहभागावर विविध सामाजिक बंधने असतात. सुरक्षिततेचा अभाव, सुविधांची कमतरता आणि रूढीवादी विचारसरणी यांमुळे मुलींना खेळाच्या समान संधी मिळत नाहीत. मात्र, खेळामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने घडते. त्यामुळे मुला-मुलींना समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी खेळ हे सामाजिक समावेशनाचे प्रभावी माध्यम आहे. त्यांच्या क्षमतांनुसार तयार केलेले खेळ आत्मविश्वास वाढविण्यास मदत करतात. पॅरालिंपिक स्पर्धांमधील खेळाडूंची कामगिरी ही प्रेरणादायी आहे. दिव्यांग मुलांना खेळाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी समाजाने आवश्यक सुविधा आणि सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

खेळ हा शांतता आणि सामाजिक ऐक्य निर्माण करणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. संघर्षग्रस्त भागांमध्येही खेळाच्या माध्यमातून संवाद आणि विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न केले जातात. विविध संस्कृतींतील लोकांना एकत्र आणण्याची क्षमता खेळामध्ये आहे. त्यामुळे जागतिक शांतता आणि बंधुभाव वाढीस लागण्यास मदत होते. संयुक्त राष्ट्रसंघाने शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये खेळाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आरोग्य, शिक्षण, लिंगसमानता आणि सामाजिक समावेशन यांसारख्या उद्दिष्टांच्या दिशेने खेळ प्रभावी योगदान देऊ शकतो.

भारतामध्ये क्रीडा क्षेत्रात गेल्या काही दशकांत उल्लेखनीय प्रगती झाली आहे. विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी देशाचा गौरव वाढविला आहे. शासनाच्या विविध योजनांद्वारे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले जात आहे. 'खेलो इंडिया'सारख्या उपक्रमांमुळे तळागाळातील प्रतिभेला संधी उपलब्ध होत आहे. तथापि, ग्रामीण भागातील अपुऱ्या सुविधा, प्रशिक्षकांची कमतरता आणि आर्थिक अडचणी यांसारखी आव्हाने अद्यापही कायम आहेत. त्यामुळे सर्व स्तरांवर क्रीडा सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण खेळाकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे. खेळ हा केवळ स्पर्धा जिंकण्याचे साधन नसून जीवनमूल्ये विकसित करणारी प्रक्रिया आहे. प्रामाणिकपणा, शिस्त, संघभावना, चिकाटी आणि नेतृत्व यांसारखे गुण खेळातून विकसित होतात. प्रत्येक बालकाला सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात खेळण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, स्वयंसेवी संस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे खेळपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

शहरीकरणाच्या वाढत्या प्रक्रियेमुळे खेळाच्या मैदानांची संख्या कमी होत आहे. उंच इमारती, वाहतुकीची समस्या आणि सार्वजनिक जागांचा अभाव यांमुळे मुलांच्या खेळण्याच्या संधी मर्यादित होत आहेत. त्यामुळे शहरांच्या नियोजनामध्ये खेळाच्या मैदानांना आणि उद्यानांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. सुरक्षित आणि सुलभ सार्वजनिक जागा निर्माण झाल्यास बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

प्रौढ व्यक्तींसाठीही खेळाचे महत्त्व कमी नाही. नियमित व्यायाम, मनोरंजनात्मक क्रीडा आणि शारीरिक उपक्रम यांमुळे तणाव कमी होतो, सामाजिक संबंध दृढ होतात आणि जीवनमान सुधारते. आजच्या धकाधकीच्या जीवनात निरोगी राहण्यासाठी खेळाची गरज अधिक वाढली आहे. त्यामुळे खेळ ही केवळ बालपणापुरती मर्यादित बाब नसून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात महत्त्वपूर्ण ठरते.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन हा प्रत्येकाला बालपणातील आनंदाची आठवण करून देणारा दिवस आहे. मातीमध्ये खेळण्याचा आनंद, मित्रांसोबत धावण्याची उत्सुकता, संघाने जिंकलेल्या सामन्याचे समाधान आणि पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याची जिद्द हे सर्व अनुभव जीवन समृद्ध करतात. खेळ माणसाला अधिक संवेदनशील, सहकार्यशील आणि सकारात्मक बनवतो.

आजच्या काळात मुलांना खेळासाठी वेळ आणि जागा उपलब्ध करून देणे ही एक सामाजिक जबाबदारी बनली आहे. अभ्यास, स्पर्धा आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामध्ये बालपण हरवू नये यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. खेळ हा मुलांच्या आनंदाचा, आरोग्याचा आणि विकासाचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच प्रत्येक बालकाला मुक्तपणे खेळण्याचा अधिकार मिळावा आणि त्या अधिकाराचे संरक्षण व्हावे, यासाठी समाजाने सजग राहणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय खेळ दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की खेळ ही चैनीची गोष्ट नसून मानवी विकासाची मूलभूत गरज आहे. खेळामधून निर्माण होणारा आनंद, आत्मविश्वास, मैत्री, शिस्त आणि सहकार्याची भावना समाजाला अधिक सुदृढ बनवते. त्यामुळे बालकांपासून प्रौढांपर्यंत प्रत्येकाने आपल्या जीवनात खेळासाठी स्थान निर्माण केले पाहिजे.

खेळ म्हणजे जीवनातील उत्साहाचा झरा, सर्जनशीलतेचा अविष्कार आणि आरोग्यपूर्ण समाजाच्या निर्मितीचे प्रभावी साधन होय. आंतरराष्ट्रीय खेळ दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येक बालकाच्या खेळण्याच्या हक्काचा आदर करूया, मैदाने जपूया, खेळ संस्कृतीला प्रोत्साहन देऊया आणि निरोगी, आनंदी, समावेशक समाज घडविण्याच्या दिशेने वाटचाल करूया. कारण खेळ ही केवळ विरंगुळ्याची कृती नाही; ती मानवतेचा उत्सव आहे, आनंदाचा श्वास आहे आणि उज्ज्वल भविष्याची आशादायी सुरुवात आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# आखाती समस्या आणि आपण...!

**आखातामधील** युद्ध सुरु झाल्यानंतर आपणासमोर इंधन संकट उभं राहिलं. देशांत आपण ऊर्जेचा वापर करतो त्यात सर्वाधिक वापर हा पेट्रोलियम उत्पादनांचा आहे आणि याबाबतीत आपण स्वयंपूर्ण नाहीत. आपल्या देशाची आधिकाधिक विदेशी मुद्रा इंधन खरेदीसाठी वापरली जात आहे. या पार्श्वभूमीवर इंधन वाचवण्याचा सल्ला देत आपण काही प्रमाणात या खर्चात बचत केली असली तरी या सर्वांचा एकत्रित परिणाम आपणास महागाईच्या रुपाने सहन करावा लागत आहे.

केवळ पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी याचाच विचार न करता आगामी काळात एकूणच ऊर्जावापर धोरण देशपातळीवरच नव्हे तर आपणास आपला घराच्या पातळीपर्यंत करण्याची वेळ आज आली आहे.

घरात गॅसच्या वापरासोबत आपण विजेचा वापर करतो या विजेच्या निर्मितीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर आपण आजही जिवाश्म (कोळसा इंधनावर) अवलंबून आहे. येणाऱ्या काळात सूपर एल निनोचे संकट आपल्या समोर आहे. हे संकट जीवनाच्या सर्वच बाजूंनी आपली परिक्षा घेणारे ठरणार आहे.

सूपर एल निनोमुळे पृथ्वीच्या तापमानात २ अंश सेल्सीअसची वाढ होईल असा अंदाज आहे. यामुळे आपला मौसमी पावसाच्या देशात पावसाचे प्रमाण कमी राहणार हे स्पष्ट झाले आहे. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादनावर होणार आहे.

**तापमान आणि सिमेटची जंगलं**

सध्या हवामान मोजताना आपण वेधशाळेचे आकडे बघतो ते ४३-४४ अंश आणि त्याच्या आसपास आहेत. प्रत्यक्षात संरक्षित जागेत मोजलेले हे तापमान हवामान काय सांगत आहे याचा एक पुरावा असतो.

मोठ्या प्रमाणावर झालेल्या शहरीकरणामुळे ऊंच सिमेंटच्या इमारतीचं जंगल आणि त्यात सिमेंट किंवा डांबरी रस्ते अशा वातावरणात दृश्य तापमान ४५ अंश असले तरी पृष्ठभागीय तापमान ५० अंशांपर्यंत वाढलेले असल्याने शहरी भागात उन्हाळा अधिक जाणवतो आणि हे सर्व पृष्ठभाग थंड लवकर होत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या तापमानात देखील आपणास उष्णता जाणवत राहते

उष्णतेपासून बचाव अर्थात पंखे, कुलर आणि ए.सी. यांचा वाढलेला वापर ज्याचा ताण मग वीज निर्मितीवर होतो आणि मग अनेक भागात लोडशेडींग आणि उष्णता असा दुहेरी त्रास जाणवत असतो. आपल्याकडे उन्हाळ्यात विजेची मागणी आणि पुरवठा यामध्ये गेल्या २ वर्षात तफावत वाढताना दिसत आहे. वीज निर्मिती केंद्रांवरील ताण वाढत आहे. याला पर्याची ऊर्जा माधन मृणजे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलविद्युत त्यात देश वेगाने वाटचाल करीत आहे. तथापि मागणी सातत्याने वाढत राहिल्यामुळे ही स्थिती कायमच आहे. एल-निनोच्या काळात हे संकट अधिक गहिरे होणार आहे.

आखाती युद्ध एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला सूपर एल-निनो चे घोंघावणारे संकट या पार्श्वभूमीवर शासन उपाय योजना करीतच आहे परंतु आपण देखील आपली जबाबदारी ओळखून यात योगदान देणे आवश्यक आहे

सार्वजनिक वाहन प्रणालीचा वापर वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. कोरोना संकटानंतर प्रत्येकाने सुरक्षा म्हणून स्वतःचे वाहन वापरणे सुरु केले यामुळे इंधन संकटासोबत पर्यावरण प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, ध्वनी प्रदूषण आणि रस्ते अपघात असे नवे दुष्टचक्र आता समोर येत आहे

सौर ऊर्जेच्या वापरातून आपण स्वत:च्या गरजेपुरती ऊर्जा किंवा त्यातील निम्मा वाटा प्रधानमंत्री सूर्यघर सारख्या योजनांमधून उचलू शकतो. पेट्रोलियम खर्चात कपात करण्यासाठी आता इलेक्ट्रीक आणि सीएनजी वर चालणारी वाहने बाजारात आली आहेत आणि त्याला चांगला प्रतिसाद दिसत आहे. असे असले तरी आगामी काळात याला अधिक गती देण्याची गरज आहे.

देशातील अग्रगण्य कंपनीने नुकतीच ए-८५ वाहन मालिका सादर केली आहे. आपण सध्या ए-२० इंधन अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रीत पेट्रोत वापरत आहोत. ए-८५ आगामी काळात वापरायची तयारी करावी लागणार आहे. या ए-८५ मुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे आणि आगामी काळ ए-३०, ए-५० व ए-८५ वाहनांचा होईल हे नकी यातून पर्यावरण रक्षणाला देखील हातभार लागणार आहे.

आपला या आसेतू हिमाचल देशात विविध प्रांतात विविध भौगोलिक रचना आणि आव्हाने आहेत. त्यात अडकून न पडता आपण या क्षमतेच्या निराकरणात अल्पसा वाटा उचलला तरी येणाऱ्या संकटाचे गांभीर्य कमी करता येईल. याबाबत प्रत्येकाने जरूर विचार करावा.

**– प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

## सराफा बाजारात मोठी उलथापालथ!

# सोने ४,३०० रुपयांनी तर चांदी १० हजारांनी घसरली; खरेदीदारांना मोठा दिलासा

मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - सोन्या-चांदीच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत असतानाच आज सराफा बाजारातून दिलासादायक बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज (MCX) पासून ते देशातील प्रमुख सराफा बाजारांपर्यंत सर्वत्र सोन्या-चांदीच्या किंमतींमध्ये मोठी पडझड पाहायला मिळाली. (Gold Silver Rate Today) गेल्या काही दिवसांपासून पश्चिम आशियातील तणाव, कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आणि जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. त्याचा थेट परिणाम मौल्यवान धातूंच्या बाजारावर दिसून आला आहे. आजच्या व्यवहारात सोने आणि चांदीच्या किंमतींमध्ये मोठी घसरण झाल्याने ग्राहकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

MCX वर ५ ऑगस्ट डिलिव्हरीच्या सोन्याच्या वायद्यांमध्ये मोठी घसरण दिसून आली. मागील सत्रात प्रति १० ग्रॅम १,५२,४४३ रुपयांवर बंद झालेल्या सोन्याचा भाव बाजार उघडताच १,४९,९२६ रुपयांपर्यंत खाली आला. सुरुवातीच्या व्यवहारातच सोन्याने जवळपास २,९४३ रुपयांची घसरण नोंदवली. त्यानंतरही घसरण कायम राहिल्याने सोने १,४९,५०० रुपयांच्या आसपास व्यवहार करत असल्याचे दिसून आले. चांदीच्या बाजारात तर आणखी मोठी पडझड पाहायला मिळाली. चउद वर चांदीच्या दरात तब्बल ५ हजार रुपयांची घसरण झाली. याशिवाय प्रत्यक्ष सराफा बाजारात चांदीच्या किंमतीत जवळपास १० हजार रुपयांची घसरण झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे चांदीचा दर प्रति किलो २.५० लाख रुपयांपर्यंत खाली आला आहे. सराफा बाजारातील ताज्या आकडेवारीनुसार, २४ कॅरेट शुद्ध सोन्याच्या दरात ४,३०० रुपयांची घसरण झाली असून ते प्रति १० ग्रॅम १,४८,८६० रुपयांवर आले आहे. दागिन्यांसाठी सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या २२ कॅरेट सोन्याच्या किमतीत ३,९५० रुपयांची घसरण झाली असून त्याचा दर १,३६,४५० रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. तर १८ कॅरेट सोन्याच्या दरात ३,२३० रुपयांची घट होऊन ते १,११,६४० रुपयांवर आले आहे.

## दृष्टीदान

दानात दान असे
श्रेष्ठ दृष्टीदान
करू या आपण
मरणोत्तर दृष्टीदान
जगात दृष्टीदाते
असतात महान
गुण गातात त्यांचे
थोर आणि लहान
दृष्टीदानाने अंधाला
प्राप्त होते दृष्टी
जीवनात त्याच्या
आनंदाची वृष्टी
मरणोत्तर दृष्टीदान
श्रेष्ठ असे कर्म
मानवांनी पाळावा
दृष्टीदानाचा धर्म
दृष्टीदानाचे महत्व
सर्वांनी जाणावे
दृष्टीदाना साठी
पुढाकार घ्यावे
दृष्टीदान कार्य
जगी आहे न्यारे
मरणोत्तर दृष्टीदान
करू आपण सारे

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# मातेच्या सुसंस्काराने घडलेला थोर समाजसेवक- साने गुरूजी

**महाराष्ट्र** ही थोरांची भूमी आहे. महाराष्ट्रात थोर संत, महात्मे, समाजसेवक व राष्ट्रभक्त यांनी जन्म घेवून आपल्या मानवी कर्तव्याने ही भूमी पावन केलेली आहे. राष्ट्राच्या व समाजाच्या कल्याणार्थ हाडाची खडी व रक्तांचे डांबर करून मानवतेची वाट निर्माण केली आहे. या थोर विभुतीत शिक्षकांचाही सिंहाचा वाटा आहे. या शिक्षकांनी मुलांच्या मनावर धर्म संस्कृती व मुल्यांचे संस्कार करून अनेक थोर पुरूष घडविलेले आहेत. अशा या थोर शिक्षकात साने गुरूजींचे स्थान अव्वल दर्जाचे आहे.

साने गुरूजींनी मातेच्या सुसंस्कारातून या विश्वातील मानवजातीसाठी अनमोल सेवा केली. साने गुरूजींना लशशिक्षशॅभाची माऊली म्हटल्यास वावगे ठरणार नाही. साने गुरूजी आपल्या परमकर्तव्यातून महाराष्ट्राची माऊली झाले. त्यांनी आपल्या साहित्य रचनेतून अनमोल संस्काराची पेरणी करून ठेवलेली आहे. ते एक थोर साहित्यिक व थोर कवी म्हणूनही महाराष्ट्राला परिचित आहेत. भारतमातेला इंग्रजाच्या जाचातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेवून ते थोर स्वातंत्र्यसेनानीही ठरले. राष्ट्रभक्त म्हणूनही त्यांना संबोधण्यात येते. विविध सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला म्हणून त्यांना सत्याग्रही म्हटल्या जाते. अशा वेगवेगळ्या भूमिका त्यांनी आपल्या जीवनात यशस्वी व सक्षमपणे पार पाडल्या. या सर्व भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी त्यांना प्रेरणा देणारी मूर्ती म्हणजे साने गुरूजींची आई होय.

आईच्या सुसंस्कारातून साने गुरूजींच्या मनाची जडण घडण निकोप निरोगीपणे झाली. आईच्या आदर्श संस्काराची शिदोरी पाठीवर घेऊन साने गुरूजींनी जीवनात विधायक रचनात्मक व योग्य दिशादर्शक कामे केली. साने गुरूजी आपल्या आईच्या महन्मंगल सुसंस्कारातून घडले. आणि म्हणूनच ते आपल्या आईला गुरू आणि कल्पतरू मानतात. अशा या थोर समाजसेवक राष्ट्रभक्त थोर शिक्षक व स्वातंत्र्य सेनानीचा जन्म २४ डिसेंबर १८९९ या दिवशी कोकणातील पालगड या गावी झाला. गुरूजीचे पांडुरंग असे नाव ठेवण्यात आलेले होते. गुरूजींच्या आईचे नाव यशोदा होते. यशोदेचे आपल्या मुलीवर अतोनात प्रेम होते. तव्दतच गुरूजीचे ही आपल्या आईवर गाढे प्रेम होते. श्यामची आई या संस्काररूपी पुस्तकात गुरूजींनी आपल्या आईच्या साऱ्या स्मृती लिहीलेल्या आहेत. त्यांच्या आईने त्यांच्या बालमनावर



विविध प्रकारचे सुसंस्कार बिंबविले. या सुसंस्कारातूनच साने गुरूजींच्या जीवनाचा सर्वांगिण विकास झाला. या विश्वातील सर्व मानव जातीवर प्राणी मात्रावर प्रेम करण्याचा धडा साने गुरूजींनी त्यांच्या आईनेच दिला. साने गुरूजी अत्यंत संवेदनशील व भावना प्रधान होते. त्यांच्यावर बालपणापासून सुसंस्कार होत असल्यामुळे त्यांचे मन संस्कारक्षम व नितीमूल्यांनी भरलेले होते. आई ही सुसंस्काराची जननी असते आणि गुरूजींची आई म्हणजे संस्कार, नितीमूल्य व नैतिकतेचे भांडार होती. त्यांनी आपल्या मुलांच्या मनात आचार व विचारात सदगुण पेरली आणि सर्व सद्गुणाची वाढ साने गुरूजींच्या ठायी योग्य दिशेने व योग्य प्रकारे लवकर झाली. साने गुरूजींनी एम.ए.ची परीक्षा पास केल्यावर ते अमळनेरच्या शाळेत शिक्षक म्हणून नौकरीला लागले. या शाळेत त्यांनी मुलांना प्रामाणिकपणे शिकवावयास सुरूवात केली. अत्यंत आत्मियता व प्रेमाने ते विद्यार्थ्यांना शिकवित त्यामुळे ते विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून गणल्या जावू लागले. शाळेच्या अनेक जबाबदाऱ्या ते आनंदाने पार पाडू लागले. विद्यार्थ्यांना स्वावलंबन व सेवावृत्ती आपल्या कृतीव्दारा त्यांनी शिकविली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आपले सारे श्रम व सारी बुद्धी खर्च केली. नोव्हेंबर १९२८ मध्ये त्यांनी 'विद्यार्थी' नावाचे मासिक सुरू केले. १९३० साली देशाच्या राजकीय आंदोलनात त्यांनी भाग घेतला. विविध प्रकारच्या सत्याग्रहात ते सहभागी होत असत. साने गुरूजी म्हणजे हाडाचे शिक्षक होते. आपल्या जवळील ज्ञान हे विद्यार्थ्यांच्या पदरात प्रामाणिकपणे टाकीत भारतातील आणि जगातील अनेक थोरांची स्फूर्तिपद चरित्रे आपल्या मधूर वाणीत मुलांना सांगत त्यांनी सुरू केलेले 'विद्यार्थी' नावाचे मासिक खान्देशाच्या गावागावात पोहचले. वर्गणीदार वाढले. संपूर्ण खान्देश जागा झाला राष्ट्रीय चळवळीचे पडसाद आणि गुलाम गिरीची चिड त्यातील लेखातून दिसू लागली. ब्रिटीश सरकारला हा विद्यार्थी राष्ट्रदूत बघवेना म्हणून सरकारने यावर बंदी घातली.

जुलमाविरूद्ध लढणारा सेनानी- देशात ब्रिटीशांची राजवट होती. ही अत्यंत जुलमी राजवट होती. अन्याय करणारी राजवट होती. जिथे-जिथे अन्याय होई तेथे ते धावून जात व प्रतिकार करीत त्यांनी प्रताप मिलच्या मजुरांना गिरणी मालकांविरूद्ध लढा देवून त्यांना न्याय मिळवून दिला. १९४२ च्या छोडो भारत नंतर देशात ब्रिटीश राजवटीविरूद्ध निकराचा लढा सुरू झाला. यावेळी साने गुरूजींनी देशातील तरूणांना योग्य व दिशादर्शक मार्गदर्शन केले. सन १९४३ साली पुन्हा त्यांना अटक झाली. १९४५ साली सुटका झाली ते स्वस्थ बसले नाहीत १९४२ च्या क्रांती युद्धात जे वीर ब्रिटींशाना बळी पडले. त्यांची चरित्रे, त्यांचे कर्तृत्व महाराष्टातील लोकांना ऐकविले व देशभक्ती राष्ट्रप्रेमाची निष्ठा युवकात निर्माण केली.

**सामाजिक बांधिलकीचे काम-** तत्कालीन समाजात अस्पृशत: मोठ्या प्रमाणात होती. हरीजनांना मंदिरात प्रवेश नव्हता. सार्वजनिक ठिकाणी त्यांना वापर नव्हता. अशा समयी सानेगुरूजी आणि सेनापती बापट यांनी हरीजनांना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी आंदोलन केले. महाराष्ट्रभर ते फिरले. पंढरपूरचे विठ्ठल, मंदिर हरिजनांना खुले करता यावे म्हणून ते दोघे पंढरपूरला पोहचले. हजारो लोकांना आपल्या तर्कशुद्ध वाणीने आपली भूमिका लोकांना समजावून सांगितली. शेवटी त्यांनी उपोषण आरंभ केले. अनेक बड्या मंडळींनी यात हस्तक्षेप केला व वाटाघाटी झाल्या शेवटी वाटाघाटी यशस्वी झाल्या व पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरीजनांना खुले झाले. शेकडो वर्ष महाराष्टाच्या साधूसंतांना जे जमले नाही ते कार्य या थोर समाजसेवकाने प्राणाची पर्वा न करता सोडविले.

**गुरूजींची साहित्य निर्मिती-** साने गुरूजींनी मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन केले. त्यांची भाषा सोपी व साधी होती. जी लोकांना आवडत होती. साने गुरूजींनी समाजाच्या उद्धारासाठी लेखन केले. १५ ऑगस्ट १९४८ साली त्यांनी साधना नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्यातून त्यांनी आपल्या समाजवादी विचारांचे लेखन केले. या सर्व साहित्यात त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक सर्वश्रेष्ठ होय. आईला गुरू मानणारे साने गुरूजी- प्रत्येक मुलांमुलीची आई त्यांची पहिली गुरू असते. साने गुरूजी आपल्या आईला आद्य गुरू मानत. आई मुलांच्या जीवनाला आकार देते. मुलांचे संगोपन, संरक्षण आईच करते. प्रत्येक गोष्ट आपण आईकडून शिकतो. असे साने गुरूजी मानायचे. आईसारखे श्रेष्ठ दैवत नाही असे साने गुरूजी म्हणत. साने गुरूजींच्या आईने सानेगुरूजीवर सखोल सुसंस्कार केले व साने गुरूजींना आदर्शरूपात घडविले. आईच माझ्या जीवनाला सुवास देणारी, माझ्या जीवनात रंग भरणारी, सार काही आईच आहे. माझे सर्वस्व आईच आहे असे मानणारे साने गुरूजी यांनी आईची महती संपूर्ण विश्वाला पटवून दिली. अशा या थोर समाजसेवक, राष्ट्रसेवक, शिक्षणसेवकावर ११ जून १९५० रोजी काळाने झडप घातली व आदर्श समासजेवक आमच्यातून हिरावून घेतला.

**-धोंडिरामसिंह राजपूत**

### मानवता खरा धर्म

साने गुरुजींचा असे
मानवता खरा धर्म
जगाला प्रेम अर्पावे
हेच मानवांचे खरे कर्म
जगातील दीन, दुबळ्यांची
करावी मनोभावे सेवा
हाच समाज सेवेचा
असे मोठा ठेवा
आई-वडील ही असती
जीवनाचे खरे आधार
वृद्धापकाळात नका करू
त्यांना कदापिही निराधार
जगातील मानव जात
प्रभूची लेकरे सर्व
त्यांची सेवा करणे
हे असे जीवनाचे पर्व
जगातील मानवा-मानवात
असावा बंधू धर्म
जाणावे दीन, दु:खीतांचे
सर्वांनी अंतर मर्म
आपणापाशी जे आहे
ते सर्वां देत जावे
जगाला सर्वांनी
प्रेम अर्पावे---

# पुण्यात गर्भलिंग निदान रॅकेटचा भंडाफोड; चिनी ॲपच्या माध्यमातून सुरू होता काळा धंदा

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) - पुण्यात उघडकीस आलेल्या बेकायदा गर्भलिंग निदान आणि गर्भपात रॅकेटने राज्यभर खळबळ उडवली आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांच्या हाती धक्कादायक माहिती लागली असून, गर्भलिंग निदानासाठी एका चिनी ॲपचा वापर केला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या रॅकेटचे धागेदोरे पुण्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांपर्यंत पोहोचल्याचे तपासातून समोर आले आहे.

मार्च महिन्यात शिरूर तालुक्यात बेकायदा गर्भलिंग निदान आणि गर्भपाताचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी एका संशयिताला अटक केली होती. त्याच्या मोबाईलची तपासणी करताना गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे एक संशयास्पद चिनी ॲप आढळून आले. याचबरोबर काही विशेष उपकरणांच्या मदतीने नियमबाह्य पद्धतीने गर्भपात शस्त्रक्रिया केल्या जात असल्याची माहितीही समोर आली.

तपासादरम्यान या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार दौंड तालुक्यातील केडगाव येथील अण्णा गिरी असल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी दोन डॉक्टरांविरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आणखी काही जणांचा सहभाग असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येम्पल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष भरारी पथकाने विविध सोनोग्राफी केंद्रांची तपासणी मोहीम हाती घेतली. एका खासगी रुग्णालयातील नोंदींची पडताळणी करताना बार्शी, करमाळा आणि आळंदी परिसरातील काही महिलांनी तेथे गर्भपात केल्याचे समोर आले. त्यामुळे या रॅकेटचे जाळे अनेक जिल्ह्यांमध्ये पसरल्याचा संशय अधिक बळावला आहे.

मुख्य आरोपी अण्णा गिरी हा कोंढवा परिसरातील एका खासगी रुग्णालयात कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्या कथित गैरप्रकारांची माहिती संबंधित यंत्रणांना असतानाही त्याच्यावर वेळीच कारवाई का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पीसीपीएनडीटी आणि एमटीपी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू असून, आणखी काही डॉक्टर, दलाल आणि रुग्णालयांचा सहभाग उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यभरातील आरोग्य यंत्रणा आणि तपास यंत्रणांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष दिले असून, दोषींवर कठोर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बागलाणमध्ये शेतकऱ्यांना कोट्यवधींचा गंडा ! मका, कांदा अन् द्राक्ष उत्पादकांची मोठी फसवणूक

**शेतकऱ्यांवर** येणारं संकट , त्याची होणारी पिळवणूक नेमकी थांबणार कधी हा मोठा प्रश्न पुन्हा एका घटनेनं उपस्थित झाला आहे. नाशिक जिल्ह्यात शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून मोठी फसवणूक झाली आहे. व्यापाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार बागलाण तालुक्यात उघडकीस आला आहे.

विशेष म्हणजे, मका, कांदा आणि द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी जायखेडा पोलीस ठाण्यात एकाच दिवशी तब्बल तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, संतप्त शेतकऱ्यांनी संबंधित व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

**मका उत्पादक शेतकऱ्यांना १ कोटी ४० लाखांचा गंडा ?**

पहिली धक्कादायक घटना ताहाराबाद येथील 'मुक्ताई ट्रेडिंग कंपनी'शी संबंधित आहे. या कंपनीच्या संचालकांनी परिसरातील १७० ते १८० मका उत्पादक शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मका खरेदी केला, मात्र त्याचे पैसेच अदा केले नाहीत, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मोहन शंकर भामरे (रा. पिंपळकोठे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, व्यापारी नारायण सुपडू बागूल, जयेश नारायण बागूल, दत्तात्रय सुपडू बागूल, संदेश दत्तात्रय बागूल आणि उमेश पाटील यांनी फेब्रुवारी २०२६ पासून शेतकऱ्यांकडून मका खरेदी सुरू केली होती.

महिन्याभरात पैसे देतो असे गोड बोलून शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यात आला. मात्र, महिना उलटल्यानंतरही पैसे देण्यास टाळाटाळ करत तब्बल १ कोटी ४० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. शेतकरी आज पैसे मिळतील, उद्या मिळतील या आशेवर दिवस काढत होते. मात्र अखेर त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

**कांदा उत्पादकांनाही सोडले नाही-** धक्कादायक बाब म्हणजे, मका खरेदीतील फसवणुकीचे आरोप असलेल्या याच व्यापाऱ्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनाही गंडा घातल्याचे समोर आले आहे. कैलास गोपीचंद ठाकरे (रा. लाडुद, ता. बागलाण) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, परिसरातील तब्बल १०२ शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करण्यात आला. पैसे महिन्याभरात देण्याचे आश्वासन देण्यात आले, मात्र नंतर शेतकऱ्यांना वारंवार हेलपाटे मारायला लावण्यात आले. अखेरीस, विक्री केलेल्या कांद्याचे पैसे न मिळाल्याने ७० लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**द्राक्ष उत्पादकांनाही लाखोंचा फटका**

त्यासोबतच द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनाही व्यापाऱ्यांनी मोठा आर्थिक झटका दिल्याचे उघड झाले आहे.

देवेंद्र दिलीप धोंडगे (रा. खामलोण) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दीपक मगन बोढारे (रा. सिडको, नाशिक) आणि शशिकांत दौलत गवळी (रा. नारायणटेंभी, ता. निफाड) या व्यापाऱ्यांनी डिसेंबर २०२५ मध्ये शेतकऱ्यांकडून द्राक्षांची खरेदी केली होती. '२१ दिवसांत पैसे देतो' असे आश्वासन देत ६९ लाख ३५ हजार २८३ रुपयांची द्राक्षे खरेदी करण्यात आली. मात्र, मुदत संपल्यानंतरही व्यापाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत पैसे देण्यास टाळाटाळ केली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

**घामाचा पैसा अडकला; शेतकरी हवालदिल** - रात्रंदिवस मेहनत करून, नैसर्गिक संकटांचा सामना करत उभा केलेला शेतमाल विकल्यानंतरही घामाचा पैसा व्यापाऱ्यांकडे अडकून पडल्याने अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. आता या संशयित व्यापाऱ्यांच्या मुसक्या आवळून अडकलेले कोट्यवधी रुपये तातडीने वसूल करून द्यावेत, अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांकडून केली जात आहे. दरम्यान, एकाच दिवशी तीन गुन्हे दाखल झाल्यामुळे बागलाण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

# नांदेड विभागात आंतरराष्ट्रीय समपार फाटक जागरूकता दिन साजरा

## २३ समपार फाटकांवर रस्ता वापरकर्त्यांचे समुपदेशन; चार लाख एसएमएस संदेशांद्वारे जनजागृती

नांदेड, दि. १० (प्रतिनिधी) - आंतरराष्ट्रीय समपार जागरूकता दिन (ILCAD) 2026 निमित्त दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत दि. ०९ जून २०२६ रोजी रेल्वे समपार फाटकांचा वापर करताना सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्याबाबत रस्ता वापरकर्त्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी व्यापक अभियान राबविण्यात आले.

हे अभियान विभागातील संरक्षा, परिचालन, सुरक्षा बल (RPF), अभियांत्रिकी तसेच सिग्नल व दूरसंचार (S&T) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. नामनिर्देशित सर्व विभागांच्या प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग घेत रस्ता वापरकर्त्यांना रेल्वे समपार फाटकांवरील सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

मुदखेड-आदिलाबाद, परभणी-जालना, परभणी-गंगाखेड आणि जालना-छत्रपती संभाजीनगर या विभागांतील सुमारे २३ समपार फाटकांवर जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. रेल्वे अधिकाऱ्यांनी रस्ता वापरकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून समपार फाटकांवरील सुरक्षितता नियमांचे उल्लंघन केल्यास उद्भवणाऱ्या धोक्यांविषयी माहिती दिली. तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यापूर्वी थांबा, दोन्ही बाजूंनी पाहा आणि मार्ग सुरक्षित असल्याची खात्री करूनच पुढे जा, असा संदेश देण्यात आला.

सुरक्षिततेचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचविण्यासाठी रस्ता वापरकर्ते व स्थानिक नागरिकांमध्ये माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. तसेच गावांमध्ये व समपार फाटकांवर ध्वनिक्षेपकांच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवून रेल्वे रुळ व समपार फाटक ओलांडताना घ्यावयाच्या सुरक्षिततेच्या खबरदारींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

समपार फाटकांवरील असुरक्षित वर्तनाचे गंभीर परिणाम अधोरेखित करणारी विशेष पथनाट्ये (नुक्कड नाटक) मुदखेड-बिंबरी, थेरबन-हदगाव रोड आणि हदगाव रोड-हिमायतनगर या विभागांतील अनुक्रमे एलसी क्रमांक ०१,०५ आणि ०९ येथे सादर करण्यात आली. या पथनाट्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले गेले तसेच महत्त्वपूर्ण सुरक्षा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात यश आले.

डिजिटल माध्यमातूनही व्यापक जनजागृती करण्यात आली. मराठवाडा परिसरातील रस्ता वापरकर्त्यांना समपार फाटकाजवळ पोहोचताना विशेष दक्षता बाळगावी व सर्व सुरक्षा सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करणारे सुमारे चार लाख एसएमएस संदेश पाठविण्यात आले. या अभियानात रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. सातत्यपूर्ण जनजागृती, शिक्षण आणि प्रसार उपक्रमांच्या माध्यमातून समपार फाटकांवरील अपघात रोखण्यासाठी व सार्वजनिक सुरक्षितता वाढविण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे कटिबद्ध असल्याचे या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले.

# 'उरीमधील भीषण स्फोटात महाराष्ट्राचे दोन जवान शहीद; गस्तीदरम्यान नियंत्रण रेषेजवळ घडली दुर्दैवी घटना

श्रीनगर, दि. १० (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या भीषण स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान हुतात्मा झाल्याने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे. देशाच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणारे हे दोन्ही जवान महाराष्ट्राचे सुपुत्र असल्याने राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे. मंगळवारी (९ जून) सायंकाळी उरीतील कमलकोट परिसरात नियमित गस्तीदरम्यान हा दुर्दैवी प्रकार घडला.

हुतात्मा झालेल्या जवानांमध्ये नवी मुंबईतील ऐरोली येथील वीर जवान विक्रम चव्हाण आणि सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील शाहपूर गावचे वीर जवान अर्जुन जाधव यांचा समावेश आहे. दोघांच्या निधनाची बातमी समोर येताच त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून गावागावांत शोककळा पसरली आहे.

**गस्तीदरम्यान अचानक स्फोट :**

लष्करी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नियंत्रण रेषेजवळील कमलकोट भागात भारतीय जवान नियमित गस्त घालत होते. त्यावेळी अचानक एक जोरदार स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी भीषण होती की विक्रम चव्हाण आणि अर्जुन जाधव हे गंभीर जखमी झाले. घटनेनंतर परिसरात तातडीने सतर्कता वाढवण्यात आली.

# रेल्वे सुरक्षेला बळकटी : नांदेड विभागात हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर नेटवर्कचा विस्तार

नांदेड, दि. १० (प्रतिनिधी) - दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने रेल्वे सुरक्षिततेच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मिरखेल आणि उमराम येथे दोन नवीन हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर (HABD) कार्यान्वित केले आहेत. हे दोन्ही डिटेक्टर २७ मे २०२६ पासून कार्यरत झाले आहेत.

या नव्या स्थापनेमुळे नांदेड विभागातील हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर (HABD) केंद्रांची संख्या तीनवरून पाच झाली असून, यापुर्वी नांदेड विभागात मुगट, बसमत आणि दौलताबाद या तीन ठिकाणी हे होते.

हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर (HABD) मुळे धावत्या गाड्यांमधील कार्ट्रिज टेपर रोलर बेअरिंग (CTRB) व ॲक्सल बॉक्सच्या स्थितीवर अधिक प्रभावीपणे आणि रिअल-टाइममध्ये नजर ठेवणे शक्य झाले आहे.

हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर (HABD) ही एक अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली असून, गाडी सामान्य वेगाने जात असताना तिच्या ॲक्सल बेअरिंगचे तापमान स्वयंचलितपणे मोजते. तापमानात असामान्य वाढ आढळल्यास संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना दिली जाते. त्यामुळे किरकोळ दोष मोठ्या बिघाडात रूपांतरित होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतात. या तंत्रज्ञानामुळे रोलिंग स्टॉक आणि रेल्वे पायाभूत सुविधांचे नुकसान टाळण्यास मदत होते, रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होतात तसेच प्रवासी आणि मालवाहतूक गाड्यांची सुरक्षितता व विश्वासार्हता वाढते. दोषांचे लवकर निदान झाल्याने देखभाल नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते आणि सेवा खंडित होण्याचे प्रमाणही कमी होते.

हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर (HABD) नेटवर्कचा हा विस्तार भारतीय रेल्वेच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक सुरक्षित, स्मार्ट आणि कार्यक्षम रेल्वे संचालनाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. नांदेड विभाग प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि दर्जेदार रेल्वे सेवा देण्यासाठी अशा आधुनिक सुरक्षा उपाययोजना सातत्याने राबवत आहे.

# देशाच्या फाळणीच्या दिवसाची आठवण जपण्यासाठी हा चित्रपट विशेषत: त्याच दिवशी प्रदर्शित केला जाणार

## 'बंटवारा १९४७' या चित्रपटाचे दिग्दर्शन दिग्गज चित्रपट निर्माता राजकुमार संतोषी

**आमिर खान** प्रोडक्शन्सने आपल्या आगामी 'बंटवारा १९४७' या चित्रपटाचे मोशन पोस्टर प्रदर्शित करून सर्वांना एक मोठे आणि शानदार सरप्राइज दिले आहे. या चित्रपटात सनी देओल मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. तीव्र, थरारक आणि थेट मनाला भिडणारे हे मोशन पोस्टर संताप, भावना आणि काहीतरी करून दाखवण्याच्या दृढ निश्चयाने परिपूर्ण आहे. शबाना आझमी, प्रीती झिंटा, करण देओल, अली फझल, अभिमन्यू सिंह, खुशी हजारे आणि कनिका कपूर यांसारख्या कलाकारांची दमदार स्टारकास्ट आणि अत्यंत लोकप्रिय क्रिएटिव्ह टीमसह हा चित्रपट प्रेक्षकांना चित्रपटगृहांमध्ये एक वेगळाच आणि अनोखा अनुभव देण्याचे आश्वासन देतो.

'बंटवारा १९४७'ची कथा अशा एका नायकाभोवती फिरते, ज्याने द्वेष आणि भीतीच्या त्या भयानक काळातही धैर्याचा मार्ग निवडला. दिग्गज कलाकारांच्या या प्रभावी फौजेसह हा चित्रपट प्रेक्षकांना ताकदीच्या आणि हृदयस्पर्शी अभिनयाचा अनुभव देणार आहे.




या चित्रपटाचे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माता राजकुमार संतोषी करत आहेत. गेल्या अनेक वर्षांत अनेक कल्ट क्लासिक चित्रपट दिल्यानंतर संतोषी आता एक अत्यंत प्रभावी आणि विचार करायला लावणारी कथा घेऊन येत आहेत.

हा चित्रपट राजकुमार संतोषी आणि सनी देओल या आयकॉनिक जोडीची तब्बल ३० वर्षांनंतरची पुनर्भेट घडवत आहे. या जोडीने भारतीय चित्रपटसृष्टीला 'घायल', 'दामिनी' आणि 'घातक'सारखे आपल्या काळातील सर्वात मोठे ब्लॉकबस्टर चित्रपट दिले होते. या दमदार मोशन पोस्टरमुळे प्रेक्षकांमधील उत्सुकता आणखी वाढली असून, ही ऐतिहासिक जोडी मोठ्या पडद्यावर पुन्हा पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत.

आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या 'बंटवारा १९४७'चे दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांनी केले असून, चित्रपटाला दिग्गज संगीतकार ए. आर. रहमान यांचे संगीत लाभले आहे. तर त्यातील अर्थपूर्ण गीतांचे लेखन जावेद अख्तर यांनी केले आहे. या चित्रपटाचे निर्माते आमिर खान आणि अपर्णा पुरोहित आहेत. देशाच्या फाळणीच्या दिवसाचे स्मरण करत हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगर महापालिकेची यशस्वी मोहिम: शहरातील १२ मोठे कचऱ्याचे कुंडे स्वच्छ आणि सुशोभित!

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)-शहराच्या स्वच्छतेच्या प्रतिमेला मोठी चालना देणारी कामगिरी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने केली आहे. शहराचे सौंदर्य बिघडवणारे १२ मोठे कचऱ्याचे कुंड्यांचे कायापालट करून पूर्णपणे स्वच्छ आणि सुशोभित करण्यात आले आहेत. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाने कचरा टाकून विद्रूप झालेल्या सार्वजनिक जागांची पुनर्प्राप्ती करण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. यामुळे शहराच्या सौंदर्यात तर वाढ होतच आहे, पायी चालणाऱ्यांसाठी मोकळा मार्ग झाला आहे. या मोहिमेला महापौर श्री. समीर राजूरकर, उपमहापौर श्री. राजेंद्र जंजाळ, सभापती श्री. अनिल मकरिये, सभागृह नेते श्री. गोविंद केंद्रे, विरोधी पक्षनेते श्री. अब्दुल समीर व सर्व वार्डातील नगरसेवकांची भरभक्कम साथ लाभली असता त्यांनी ही इशारा दिला आहे की शहर अस्वच्छ करणाऱ्यांवर कोणतीही गय केली जाणार नाही.

हा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी मनपाने अत्यंत पद्धतशीर आणि धोरणात्मक मोहीम हाती घेतली होती. सर्वप्रथम कचरा टाकल्या जाणाऱ्या जागांची यादी तयार करण्यात आली आणि तिथे लोक कचरा का टाकतात, याचा सखोल अभ्यास करण्यात आला. अनेक ठिकाणी घंटागाडी न येणे, ती वेळेवर न येणे किंवा घंटागाडीची वेळ आणि नागरिकांची वेळ यात विसंगती असणे अशा समस्या विश्लेषणानंतर समोर आल्या. यावर उपाय म्हणून घंटागाड्यांची वेळ निश्चित करून त्या नियमित करण्यात आल्या, तसेच त्यांचे 'रूट मॅपिंग' करण्यात आले. यासोबतच परिसरात व्यापक जनजागृती मोहीम राबवून स्पॉट मॉनिटरिंग सुरू करण्यात आले. जेव्हा त्या जागांवर कचरा येणे पूर्णपणे बंद झाले, तेव्हा त्या भागाचे सुशोभीकरण करण्यात आले. ही स्वच्छता कायम राहावी यासाठी आता सकाळी आणि संध्याकाळी विशेष देखरेख ठेवली जात असून तरीही कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उचलण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत शहरात एकूण १२ मुख्य जागांवर ही कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने नागेश्वरवाडी प्रभाग १७ (पोलीस चौकी समोर), बाग्गा इंटरनॅशनल, आणि आकाशवाणी रिलायन्स ट्रेंड्स (मॉल जवळ), बीड बायपास येथील देवळाई (सोना किचन एंड बार जवळ), सातारा परिसरातील मिराजगावे नागरी, जटवाडा रोडवरील हरसिद्धी लॉन्स, आणि शिवाजी हायस्कूल जवळील परिसर या भागांचा समावेश आहे. याशिवाय आझाद चौक ते रोशन गेट डिव्हाईडर, गुलमंडी (गायत्री चाट समोर), कुंभारवाडा नाल्याचा जवळ, मिल कॉर्नर ते बारपुल्ला गेट डीपी आणि सिल्लेखाना येथील शासकीय ग्रंथालय या परिसरांचाही यात समावेश आहे.



**पुढील लक्ष्य: नाल्यांच्या कडेला राहणाऱ्या घरांवर विशेष लक्ष**

मनपाचे पुढील लक्ष्य आता शहरातील नाल्यांच्या कडेला राहणाऱ्या रहिवाशांवर असणार आहे.

नाल्यांच्या शेजारी राहणारे अनेक नागरिक थेट खिडकीतून नाल्यात कचरा फेकत असल्याचे समोर आले आहे. मनपा उपायुक्त व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे यांनी सांगितले की, 'आमची पथके आता नाल्यांच्या कडेला राहणाऱ्या घरांची तपासणी करणार आहेत. हे नागरिक घंटागाडीत कचरा देतात की नाही, आणि देत नसतील तर कचऱ्याची विल्हेवाट कुठे लावतात, याचा शोध घेतला जाईल. नाल्यांमध्ये कचरा टाकणे थांबवण्यासाठी गरज पडल्यास कडक दंडात्मक कारवाई केली जाईल.'

### घंटागाडी तक्रारींसाठी हेल्पलाइनचा वापर करा, रस्त्यावर कचरा टाकू नका-मनपा आयुक्त अमोल येडगे

नवीन कचरा संकलन प्रणाली अंतर्गत शहरात १०० टक्के 'डोअर टू डोअर' (घरोघरी जाऊन) कचरा गोळा केला जात असून सर्व वाहनांवर व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टीम द्वारे लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांना घंटागाडी किंवा तिच्या वेळेबाबत काहीही तक्रार असल्यास त्यांनी थेट ८८८८७७८८५१ हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. मात्र, कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर कचरा फेकू नये. तसेच, दुकानदारांनीही रस्त्यावर कचरा न टाकता आपल्या दुकानाबाहेर डस्टबीन (कचराकुंडी) ठेवणे बंधनकारक आहे नाही तर त्याना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.'

**- अमोल येडगे**
(महानगरपालिका आयुक्त)

# जिल्हाधिकाऱ्यांची पिंपरी गावात भेट; शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची केली विचारपूस





छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज पिंपरी ता. खुलताबाद या गावास भेट दिली. येथे त्यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची भेट घेतली व जनगणना कार्याची पडताळणी केली.

त्यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी एम, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन तसेंच अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी पिंपरी या गावातील विष्णू काशिनाथ जोगदंड या दिवंगत शेतकऱ्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. या कुटुंबाला विविध शासकीय योजनांचे देण्यात आलेले लाभ, त्यांची सद्यस्थिती याबाबत आस्थेवाईकपणे विचारपूस केली. तसेच आगामी हंगामासाठी बियाणे थैली दिली.

याच गावात झालेल्या जनगणना कार्याची पडताळणी ही जिल्हाधिकारी गौडा यांनी केली.

बाबुलाल भाऊलाल कुदळे यांच्या कुटुंबाची गणना झाल्याची खात्री त्यांनी मोबाईल अँपवर करून खात्री केली.

# पी.एम. किसान योजनेतील लाभार्थ्यांनी ३० जूनपूर्वी ई-केवायसी पूर्ण करावे

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम. किसान) योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने दिली जाते. या योजनेतील लाभ केवळ पात्र आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाने सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण अनिवार्य केले आहे.

पी.एम. किसान योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांनी ३० जून २०२६ पूर्वी ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक असून, अन्यथा आगामी हप्त्याचा लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. शासनाच्या निर्देशानुसार १०० टक्के ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. लाभार्थी शेतकरी आपल्या जवळच्या सामाईक सेवा केंद्रात जाऊन बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे किंवा पी.एम. किसान मोबाईल ॲपवरील फेस ऑथेंटिकेशन सुविधेच्या माध्यमातून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. या दोन्ही पद्धतींपैकी कोणत्याही एका पद्धतीचा वापर करून प्रमाणीकरण करता येणार आहे. ग्रामस्तरीय नोडल अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचारी यांच्या सहकार्याने गावागावात पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ज्यांना मोबाईल वापरण्यात किंवा तांत्रिक प्रक्रियेत अडचणी येत आहेत, त्यांनी ग्रामस्तरीय नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फेस ऑथेंटिकेशनद्वारे ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने केले आहे. ई-केवायसीच्या अभावी कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी ३० जूनपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बदाम, शेंगदाणा, चिंचोका गिळलेल्या तीन चिमुकल्यांना घाटीत जीवदान

छत्रपती संभाजीनगर, दि. १० (प्रतिनिधी) - लहान मुले हि देवाघरची फुले असे साने गुरुजी यांनी आपल्या साहित्यात वर्णन केले आहे. मुलांचा सहवास हा परमेश्वराच्या सान्निध्यात असल्यासारखे वाटते. अशा अनेक गोष्टी ऐकत असताना अनेकदा पालकांचे थोडेसे दुर्लक्ष जीवघेणे ठरते. छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात तीन दिवसात तीन चिमुकल्यांना जीवदान मिळाले. बदाम, शेंगदाणा आणि चिंचोका गिळलेल्या रुग्णांना कान नाक घसा आणि बालरोग विभागाच्या सतर्कतेने यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या आहे.

आयान सय्यद या दोन वर्षांच्या मुलाने घरात खेळतांना बदाम गिळला होता. खोकला आणि दम लागत असल्याने आवाज बदलला होता. कुटुंबियांनी तात्काळ घाटी रुग्णालयात दाखल केल्यानंतर बालरोग विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे-मोरे यांनी तपासणी करुन ईएनटी विभागाकडे पेशंट वर्ग केले. कान नाक घसा विभागप्रमुख डॉ. सुनिल देशमुख यांनी तातडीने ब्रॉन्कोस्कोपी शस्त्रक्रियाद्वारे गिळलेला बदाम अलगद बाहेर काढला. तसेच गायत्री बोराडे या वर्षीय मुलीने घरात असताना शेंगदाण गिळला. तिच्या फुफ्फूसात शेंगदाणा अडकल्याने तिच्या त्रास झाल्याने कुटुंबियांनी घाटी रुग्णालयात दाखल केले. तसेच ८ वर्षीय सई काकडे या रुग्णाने चिंचोका गिळल्याने श्वास घेण्यास त्रास झाला होता. या तीन रुग्णांवर घाटी रुग्णालयात अगदी तातडीने व मोफत शस्त्रक्रियासह उपचार करण्यात आले. कुटुंबियांनी घाटी प्रशासन व डॉक्टरांचे आभार मानले.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली बालरोग विभागप्रमुख प्रभा खैरे-मोरे, ईएनटी विभागप्रमुख सुनिल देशमुख, डॉ. सोनाली जटाळे, डॉ. ओजस कुलकर्णी, डॉ. उत्कर्ष शहा, डॉ. ओम प्रकाश, डॉ. चेतना, डॉ. वत्सल, ओटी इन्चार्ज अश्विनी झेंडे, राहिला शेख, भूलतज्ञ डॉ. विद्या चव्हाण, डॉ. किरण आदींनी यासाठी परिश्रम घेतले.

# घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करा-जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर दि.१० (प्रतिनिधी)- घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज वेरूळ ता. खुलताबाद येथे दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी वेरूळ येथील मालोजीराजे भोसले यांच्या गढीला भेट दिली. शहाजीराजे भोसले स्मारकाची पाहणी केली. वेरूळ येथे सुरू असलेल्या घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामांची पाहणी करून विकास कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.





याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, नायब तहसीलदार सुभाष पांढरे, सहाय्यक गटविकास अधिकारी हणमंत बोयनर, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे, विस्तार अधिकारी विलास केवट, दीपक बागुल, मंगेश शिंदे, प्रतिभा कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक बी के चव्हाण, मंडळ अधिकारी विजय चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी भूषण रोजेकर, ग्रामपंचायत अधिकारी गंगाधर गायकवाड, पोलीस पाटील रमेश ढिवरे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वेरूळ भेटी प्रसंगी जिल्हाधिकारी गौडा यांनी जनगणनेच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला. वेरूळ येथे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांशी संवाद साधला. बुधवारी रात्री जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे वेरूळ येथे मुक्कामी होते.

(पान १ वरुन)

## नेहरू कुटुंबाचा त्याग विसरता....

यांच्या देशाच्या प्रमुखांनी येणे अपेक्षित होते. परंतु ते आले नाहीत. मी इथे इंदिरा गांधी म्हणून नाही तर ४० कोटी जनतेची प्रतिनिधी म्हणून आले आहे हा खुलासा पवारांनी केला. कार्यकर्त्यांना संबोधित करतांना ते म्हणाले की, ''सत्ता असो वा नसो, तुम्ही कार्यकर्त्यांनी कधी त्याची चिंता केली नाही. अनेकांनी आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा काळ विरोधी पक्षात घालवला आहे. सत्ता असली की आपण सत्तेच्या माध्यमातून काम करतो आणि सत्ता नसेल तेव्हा लोकांमध्ये जाऊ काम करतो. हीच आपली खरी परंपरा आहे.'' ''आज सुशिक्षित बेरोजगार, आदिवासी, महिला आणि अल्पसंख्याक अशा विविध घटकांच्या समस्यांनी देशाला ग्रासले आहे. ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांना या प्रश्नांवर किती आस्था आहे, यावर भाष्य न केलेलंच बरं. काही लोक सतत एकच गोष्ट सांगायचा प्रयत्न करत आहेत की, या देशात असा एखादा पूर्वी नेता झालाच नाही'', असेही शरद पवार म्हणाले.

## शक्तीपीठ महामार्गाविरोधात विटा...

शेतकऱ्यांचा ड्रोन मोजणीला विरोध कायम आहे. यासंबंधी शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सोशल मीडियात व्हिडीओ शेअर करत पोस्ट लिहून पोलिसांवर हल्लाबोल केला. राजू शेट्टी म्हणाले, सांगली जिल्ह्यातील विटा-नागेवाडी येथे शक्तीपीठ महामार्गाचा मोजणी करण्यासाठी रात्री २ वाजल्यापासून पोलिस तैनात करण्यात आले होते. दिवसभर उन्हातान्हात काबाड कष्ट करून झोपलेल्या शेतकऱ्यांना कोणतीही अधिसूचना न काढता शक्तीपीठ मार्गाची जमीन मोजण्यासाठी पहाटे दोन -तीन वाजल्यापासून पोलिस त्रास द्यायला सुरवात केले आहेत.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME -** PATHAN NABAB ABDUL
**NEW NAME -** NAVABKHO ABDUL PATHAN
PERMANENT
**ADDRESS :** AT SHIVANI,AURANGABAD, BIDKIN MAHARASHTRA, 431105

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME -** FARHEEN BEGUM YAYAH BIN HAMOOD CHAUSH
**NEW Name:-** FARHEEN MASOOD BASHAMAQ
**ADD :-** Plot No 18/2, Bhakti Nagar, CH.SAMBHAJI NAGAR (AURANGABAD)

# 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्य शासन, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यात नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विकसित करण्यासाठी सामंजस्य करार

मुंबई दि.१० (प्रतिनिधी)- 'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.'

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०,००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, 'क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे.'

ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, 'नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे.' आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, 'जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.' महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.